ISSN 2231-1629
Knowledge Resonance
*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारताचे परराष्ट्र धोरणः निर्धारक घटक, समस्या आणि आव्हाने

**रत्नदीप राजेंद्र गणवीर**
*संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग,*
*गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली*

***सारांश :***
*देशाच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीसाठी इतर देशांशी मैत्रीपूर्ण व सौदार्ह्याचे संबंध प्रस्थापित करणे आधुनिक काळात फार महत्वाचे आहे. असे संबंध प्रस्थापित करतांना काही विशिष्ठ तत्त्वे आणि धोरणे तयार करावी लागतात. परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली अश्याच तत्व आणि धोरणावर आधारलेली असते. परराष्ट्र धोरणाची तत्वप्रणाली साधी, सोपी किवा संक्षिप्त, गुंतागुंतीची आणि संधीग्ध पणे असू शकते. परराष्ट्र धोरणात निश्चितपणे राष्ट्र राज्याची राजकीय उद्दिष्टे नैतिक तत्त्वे आणि राष्ट्र हिताची परिभाषा याचा समावेश होतो. परराष्ट्र धोरण हे आंतर्राष्ट्रीय संबंधामुळे तयार होत असते. राष्ट्र राज्याच्या निर्मितीशी संबंधित ऐतिहासिक घडामोडी, राष्ट्र निर्मितीची वैचारिक तत्व, चौकट आणि राष्ट्र राज्याच्या अस्तित्वाचे तार्किक अधिष्ठान त्यांचा परस्पर संगमातून परराष्ट्र धोरनाचा उगम होतो. राष्ट्राच्या राज्य संस्थेचा प्रकार, अर्थवेवस्थेचे स्वरूप, राष्ट्राच्या गरजा, राजकीय परिस्थिती, भौगोलिक स्थान आणि सांस्कृतिक जळणघडण यांचा संयुक्त साच्यातून परराष्ट्र धोरणाला आकार प्राप्त होतो. राष्ट्रहित संबंध हाच जगातील प्रत्येक राष्ट्राचा मुख्य आधार असल्यामुळे परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रहित चांगल्या प्रकारे कसे साधता येईल याचाच विचार प्रत्येक राष्ट्र करीत असतो. म्हणून परराष्ट्र धोरणाला राष्ट्रीय उद्दिष्ट्ये साध्य करण्यासंबंधीची तत्त्वे असे म्हटले जाते. अर्थात परराष्ट्र धोरनाच्या तत्वा इतकेच त्या संबंधीच्या मार्गानाही महत्व दिले जाते.*

**प्रस्तावना :**

भारताचे प्राचीन काळापासून जगातील इतर देशांशी सौदार्ह्याचे संबंध होते. पण ब्रिटीश राजवटीमध्ये त्यांचा वसाहतवादी हेतूने प्रेरित परराष्ट्र धोरणामुळे भारताच्या इतर देशांशी असणाऱ्या संबंधामध्ये बदल झाला. भारताच्या परराष्ट्र धोरणाची स्थूल जळण घडण स्वातंत्र्यपूर्व काळातच झाली. ब्रिटीशांच्या परराष्ट्र धोरणावर टीका करून राष्ट्रीय चळवळीत धुरिणांनी सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण अस्तित्व या तत्वावर आधारित परराष्ट्र धोरणाचा पुरस्कार केला. स्वातंत्र प्राप्ती पासून तर आज तागायत देशाच्या परराष्ट्र धोरणावर पंतप्रधांनांचा विशेष प्रभाव दिसून येतो. स्वातंत्र्य नंतर पहिले पंतप्रधान आणि परराष्ट्र धोरणाचे निर्माते पं. जवाहरलाल नेहरू यांनी ब्रिटीशांच्या परराष्ट्र धोरणातील कटू अनुभवापासून बोध घेत देशाचे परराष्ट्र धोरण आखले. अलिप्ततावाद आणि साम्राज्यवादाला विरोध, वर्ण द्वेष विरोध, जागतिक शांतता, प्रादेशिक सहकार्य, निशस्त्रीकरणाला पाठींबा ही परराष्ट्र धोरणाची तत्त्वे आहेत.

**परराष्ट्र धोरणाचे निर्धारण :**

परराष्ट्र धोरणाचे निर्धारण ही गुंतागुंतीची प्रक्रिया असते. प्रत्येक देशाची भौगोलिक परिस्थती, सांस्कृतिक व ऐतिहासिक परंपरा, सामाजिक व सांस्कृतिक मुल्ये, आर्थिक विकास, विचारप्रणाली, नेतृत्व इत्यादी अनेक घटक परराष्ट्र धोरनाचे निर्धारण करण्याच्या प्रक्रियेत सहभागी झलेले असतात. देशाचे परराष्ट्र धोरण ठरविण्याचा किंवा परराष्ट्र धोरण विषयक महत्वाचे निर्णय घेण्याचा अधिकार देशाच्या सरकारला प्राप्त झालेला असतो. कोणतेही सरकार पूर्णतः स्वतःच्या मर्जी प्रमाणे किंवा लहरी प्रमाणे त्या संबंधीचे निर्णय घेऊ शकत नाही. सदर संदर्भाकीत केलेल्या घटकाचा संदर्भातच सरकारला आपल्या देशाच्या परराष्ट्र धोरणासंबंधी निर्णय घेणे किंवा परराष्ट्र धोरणाची आखणी करणे भाग असते.

प्रत्येक देशातील सरकार देशांतर्गत तसेच बाह्य परिस्थितीशी संबंधित असलेल्या विविध घटकांचे योग्य ते दाखल घेऊन आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी करीत असते. म्हणजे परराष्ट्र धोरण विषयक निर्णय घेणे हे अधिकारावर असलेल्या सरकारचे काम असते. प्रत्येक देशाच्या शासन वेवस्थेतील प्रमुख घटक त्या संबंधीची जबाबदारी उचलत असतात. कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, व न्याय मंडळ हे शासन व्यवस्थेचे तीन प्रमुख घटक आहेत.[1] या पैकी न्याय मंडळ या घटकाचा किंवा संस्थेचा देशाच्या परराष्ट्र धोरणाच्या निर्धारनार्शी फारसा संबंध येत नाही. परंतु कायदे मंडळ व कार्यकारी मंडळ या दोन संस्था मात्र परराष्ट्र धोरणांच्या निर्धारणात महत्वाची भूमिका बजावत असतात. या खेरीज नौकरशाही या एका घटकांची भूमिकाही महत्वाची असते.

**कायदेमंडळ :**

देशाच्या परराष्ट्र धोरणाचे निर्धारण करण्यात आणि परराष्ट्र धोरणाची रूपरेषा ठरवण्यात कायदे मंडळाचा महत्वाचा सहभाग असतो. भारतीय राज्य घटनेने संसदीय शासन प्रणालीचा स्वीकार केलेला आहे. म्हणून परराष्ट्र धोरणाच्या निर्धारावरील कायदे मंडळाच्या भूमिकेची चर्चा करण्यापूर्वी संसदीय शासन पद्धतीत कायदे मंडळाला विशेष स्थान लाभलेले आहे. संसदीय पद्धती मधील परराष्ट्र धोरणाच्या निर्धार्नाचे स्वरूप हे सर्वसाधारण धोरण निर्धारण प्रक्रियेच्या स्वरूपा प्रमाणेच आहे. म्हणजे असे की, परराष्ट्र धोरण विषयक प्रत्येक महत्त्वाच्या निर्णयाला संसदेची मान्यता मिळणे आवश्यक असते. देशाचे परराष्ट्र धोरण ठरविण्याचे अधिकार मंत्रिमंडळाला मिळालेला असला तरी, मंत्रीमंडळ संसदेची

मान्यता मिळाल्या शिवाय कोणताही निर्णय अमलात आणू शकत नाही.[२] थोडक्यात संसदेच्या मान्यतेवरच परराष्ट्र धोरण विषयक निर्नयाची अंतिम कार्यवाही अवलंबून असते.

**कार्यकारी मंडळ :**

कोणत्याही शासन व्येवस्थेत कार्यकरी मंडळाला विशेष महत्व प्राप्त झालेले असते. शासन संस्थेच्या सत्तेची खरी खुरी सूत्रे कार्यकारी मंडळाच्या हाती एकवटलेली असतात. भारताच्या केंद्र शासनाचा विचार करता केंद्रीय कार्यकारी मंडळात राष्ट्रपती, पंतप्रधान व केंद्रीय मंत्रिमंडळ यांचा समावेश होतो. देशाच्या परराष्ट्र धोरणा विषयी निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार केंद्रीय मंत्री मंडळालाच लाभलेला आहे.[३] मंत्रीमंडळ राष्ट्रहित संबंधाला केंद्र स्थानी ठेऊन या संबंधीचे निर्णय घेत असते. आंतर्ष्ट्रीय राजकारणातील घडामोडी किंवा हितसंबंध सुरक्षित राखण्या साठी आणि ते वृन्धिगत करण्या साठी कोणत्या उपयोजना कराव्यात इत्यादी सर्व बाबी केंद्रीय मंत्री मंडळाच्या अधिकारात येतात. तसेच परराष्ट्र धोरणाच्या निर्धारणासाठी परराष्ट्र मंत्रालयाचा व्येवहार महत्वाचा असतो.

**नौकरशाही :**

देशाच्या परराष्ट्र धोरणाची प्रतेक्ष कार्यवाही किंवा अंमलबजावणी करणे हे नौकरशाही चे मुख्य कार्य असले तरी परराष्ट्र धोरणाच्या निर्धारनातही तिचा सहभाग असतो. परराष्ट्र धोरणाचे निर्धारण किंवा परराष्ट्र धोरणाशी संबंधित प्रश्नावरील निर्णय हा केंद्र सरकारचा म्हणजे केंद्रीय मंत्रीमंडळा चा अधिकार होय. परंतु शासनाच्या कोणत्याही धोरणात्मक निर्णय वास्तव परिस्थिती च्या आधारावरच घेतला जातो. सरकारचा प्रत्येक धोरणात्मक निर्णय वस्तुनिष्ठ असावा लागतो. अश्या प्रकारच्या वस्तू निष्ठ धोरणा साठी त्या प्रश्नाशी संबंधित वास्तव परिस्थिती ची योग्य ती दाखल घेणे आवशक ठरते. म्हणजे कोणताही महत्वाचा निर्णय घेतांना सर्व प्रथम माहितीचे किंवा वस्तुस्थिती चे संकलन करणे गरजेचे असते. या साठी सरकारला म्हणजे च मंत्रीमंडळाला नौकारशाही चे सहकार्य घेणे भाग पडते.[४] कोणत्याही प्रश्नावर सरकारला आवशक ती माहिती उपलब्ध करून देण्याचे कार्य नौकारशाही यंत्रणा करीत असते. परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात हे कार्य परराष्ट्रातील वकिलाती किंवा राजनयिक कार्यालये तसेच परराष्ट्र व्यवहार मंत्रालय इत्याद्दी विभागाकडून पार पाडले जाते.

**भारतीय परराष्ट्र धोरणातील नेहरू ते मोदी यांचा प्रवासः**

**पं. नेहरू चा कालखंड :**

भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून पं. नेहरूना ओळखले जाते. नेहरूंनी भारतीय परराष्ट्र धोरनाला आदर्श तत्वाचा आधार दिला. आणि नैतिक मुल्यांची जोड दिली. नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे हितसंबंधा पेक्षा विचारसरणीवर भार देनारे होते. त्यांनी विश्वशांती ला प्राधान्य दिले होते. या नुसार त्यांनी भारत पाकीस्थान, भारत चीण संघर्ष सोडविण्याचे धाडस दाखविले. दुसऱ्या महायुद्धा नंतर अमेरिका व रशिया या दोन देशाच्या संघर्षाने युद्धजन्य परिस्थितीत नेहरूने अलिप्ततावाद हे धोरण स्वीकारले.[५] हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे अत्यंत महत्त्व पूर्ण ठरले. मानवी संबंधाला अधिक महत्त्व देऊन साम्राज्यवाद व वंशवादी तत्वाचा त्यांनी स्वीकार केला. "पंचशील तत्व हे भारतीय परराष्ट्र धोरणाला नवीन उंचीवर नेणारे ठरले. या नुसार भारत चीन या दोन्ही देशात करार झाला. हे हितसंबंध केवळ भारता पुरते मर्यादित नव्हते तर ते जागतिक स्वरूपाचे होते.

**लाल बहादुर शास्त्री :**

पं. नेहरू नंतर देशाची धुरा १९६४ साली लालबहादूर शास्त्री यांनी संभाळली. त्यांनी पंतप्रधान कार्यालयाच्या अधीकार क्षेत्रात वाढ केली. त्यांचा काळात भारत पाकिस्तान युद्ध झाले. केली .

**इंदिरा गांधी :**

इंदिरा गांधीचा काळ हा भारतीय परराष्ट्र धोरणाचा वास्तववादी काळ होता. भारतीय परराष्ट्र धोरण आदर्शवादाकडे झुकलेले होते. इंदिरा गांधीच्या काळात भारतीय परराष्ट्र मंत्रालया पेक्षा पंतप्रधान कार्यालयाला अधिक महत्त्व प्राप्त झाले. इंदिराजिनी आपल्या शेजारी राष्ट्रांना विश्वासात घेत रशिया, अमेरिका या देशांना भेटी देऊन मैत्रीपूर्ण संबंध निर्माण केले. 1971 ला त्यांच्या पुढाकाराने बांगलादेश ची निर्मिती झाली.[७] 1974 ला त्यांनी पोखरण येथे अणुचाचणी घेतली आणि जगात भारताची प्रतिमा भरून निघाली.

**राजीव गांधी :**

इंदिराजीनचा वारसा लाभलेल्या राजीवजींनी जगातील शक्तिशाली राष्ट्राशी मैत्री चे संबंध प्रस्थापित केले. तांत्रिक युगाची सुरुवात घडवून आण्यात त्यंचा मोठा वाटा आहे. त्यांचा काळात दक्षिण आशिया, प्रादेशिक सहयोग संघटना, सार्क ची स्थापना झाली.[८] तसेच 1987 ला श्रीलंकाशी करार करून शांतीसेना श्रीलंकेत पाठवली व या शांतीसेना च्या माध्यमातून श्रीलंका चे अह्स्त क्षेपाचे धोरण भंग झाले, ज्याचा परिणाम राजीव गांधींच्या हत्येने झाला.

**पी. व्ही. नर्सिंग राव :**

1991 मध्ये नर्सिंग राव यांनी पंतप्रधानाची धुरा हाती घेताच जागतिकीकरनास सुरुवात झाली. जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण हे धोरण स्वीकारले. हे धोरण स्वीकारल्यामुळे पूर्वे कडील देशांना अधिक महत्व प्राप्त झाले. नर्सिंग राव यांच्या पंतप्रधानाच्या कारकिर्दी मध्ये परराष्ट्र धोरणात आर्थिक घटकाला महत्व प्राप्त झाले.

**अटल बिहारी वाजपेयी :**

वाजपेयी यांच्या पंतप्रधानाच्या कारकिर्दी मध्ये पराष्ट्र धोरनाला नवीन आयाम प्राप्त झाले होते. यांच्या कालावधी मध्ये परराष्ट्र धोरणात राष्ट्रीय हितसंबंध अधिक दृढ होऊ लागले. 1998 ला दुसरी अणुचाचणी करण्यात आली. ज्यातून भारत "अण्वस्त्रधारी देश" अशी प्रतिमा निर्माण झाली.[९] 1999 ला कारगिल युद्ध झाले ज्यात पाकीस्थान चा दारूण पराभव झाला. त्या नंतर

वाजपेयी यांनी समझौता एक्सप्रेस च्या माध्यमातून मैत्री पूर्ण संबंध निर्माण करून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

**डॉ. मनमोहन सिंग :**

डॉ. मनमोहन सिंग हे नरसिंग राव सरकार मध्ये अर्थमंत्री होते. त्याचा फायदा पंतप्रधान झाल्या नंतर अधिक झाला. यांनी परराष्ट्र धोरणावरील लुक इस्ट पॉलिसि वर अधिक भर दिला. त्यामुळे २००५ साली भारत इस्ट आशिया समित्ती चा सदस्य बनला. याच कालावधीत अमेरिके सोबत अणू कराराच्या संदर्भात चर्चा शुरू केली आणि 2008 ला ऐतिहासिक अणूकरार घडवून आणला.[१०] यामुळे भारताची प्रतिमा जागतिक राजकारणात अधिकच वाढली. भारताने युरोपियन युनिअन व जगातील विविध राष्ट्राबरोबर आर्थिक संबंध सुधारण्याची सुरुवात केली. सिंग यांचे परराष्ट्र धोरण आर्थिक विकासावर आधरित होते. त्यांच्या परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून दहशतवाद हा मुद्दा जागतिक स्तरावर मांडण्यात भारत यशस्वी झाला आहे.

**नरेंद्र मोदी :**

२०१४ साली नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे सरकार सत्तेत आले. त्यांनी आजवर ७५ देशाचा दौरा केला असून भारतीय परराष्ट्र धोरणा मध्ये दक्षिण आशीयाइ राष्ट्रांना सर्व प्रथम स्थान दिले.[११] शांतता, राजकीय सोई व विकास या गोष्टींना महत्व देऊन आर्थिक संबंध घानिष्ठ करण्यास मदत केली. मोदीनी जापान, दक्षिण कोरिया, चीन, सिंगापूर या चार देशांच्या निर्यात श्रम विकासाचे मॉडेल समोर ठेऊन गुंतागुंतीला परराष्ट्र धोरणां मध्ये वास्तव वादाला अधिक महत्व दिले गेले आहे.

प्रत्येक पंतप्रधानाच्या परराष्ट्र धोरणात आर्थिक घटक महत्व पूर्ण ठरलेला आहे. नेहरूंच्या आदर्श वादी या तत्वावर परराष्ट्र धोरणाची सुरुवात झाली. आणि मोदी यांच्या वास्तववादाकडे वाटचाल करतांना दिसत आहे. वास्तववादा सोबतच आर्थिक व संरक्षण या दोन्हीचा प्रभाव परराष्ट्रावर दिसून येतो.

**परराष्ट्र धोरणा समोरील आव्हाने :**

राष्ट्रीय सुरक्षा : एकीकडे अमेरिका आणि युरोपियन राष्ट्रा मधून आर्थिक समस्या मुळे अलिप्ततेची, तटस्थतेची मानसिकता बळावत चालली आहे. तर दुसरी कडे चीनचा संरक्षण खर्च, लष्करी आधुनिकीकरणाची प्रकिया, विस्तारवाद, आणि आक्रमकता वाढत आहे. अंतर्गत आणि बाह्य सुरक्षेशी निगडीत आव्हाने व्यवस्थापन करण्यासाठी सूत्रबद्ध, सर्वसमावेशक राष्ट्रीय सुरक्षा धोरण आखण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

**व्यवस्थापन :**

चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचे वाढत्या आक्रमकतेचे व विस्तारवादी वृत्तीचे व्यवस्थापन करणे भारताला क्रमप्राप्त आहे. एक म्हणजे भारताचे संरक्षण सामर्थ्य वाढवणे त्यात आण्विक प्रतीरोधन बळकट करणे व चीण च्या आक्रमकते मुळे असुरक्षित राष्ट्रांच्या संरक्षण युती बनवून त्यात सहभागी होने आणि चीन बरोबर संवादाची प्रक्रिया चालु ठेवणे या तिन्ही पर्यायां मध्ये योग्य समतोल साधून चीनच्या आव्हानांचे व्यवस्थापन करावे लागणार आहे.

**आर्थिक विकास :**

अशियाइ राष्ट्रवादाचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या जपानचे आकर्षण भाजपा पक्षाला सुरुवाती पासुंचेच राहिले आहे. मोदी आपल्या परराष्ट्र धोरणात जापान बरोबर आर्थिक व संरक्षक अशा दोन्ही पाटल्यावर संबंध मजबूत करण्यावर भर देत आहेत. विशेष म्हणजे मोदी यांनी या पूर्वीच जापान, चीन, सिंगापूर या राष्ट्राचा दौरा केला आहे. आग्नेय आशियाइ राष्ट्राचे महत्व हे भारताच्या आर्थिक विकासासाठीचे आव्हान आहे.

**पाकिस्तान चा सीमावाद :**

पाकिस्तान बरोबरचा कोणताही प्रश्न हा युद्धाच्या मार्गाने सोडवता येणार नाही. कारण आता दोन्ही राष्ट्रे अण्वस्त्रधारी आहेत. त्यांच्यातील कोणताही छोटा संघर्ष हा अणू युद्धाचे रूप धारण करू शकतो. त्यामुळे शांतता प्रक्रिया चालु ठेवणे हा एकमेव पर्याय आहे. दुर्दैवाने ही प्रक्रिया 2008 पासून खंडित झाली आहे. भारत पाकिस्तान सीमा वाद हा शांततेच्या मार्गाने सोडवता येऊ शकतो ही शांतता बोलणी त्वरित सुरु करणे हे मोदी च्या पुढे असलेले आव्हान आहे.

**अमेरिके सोबतचे संबंध :**

मोदी यांच्या पुढे अमेरिका सोबतचे संबंध सोडवणे हे आव्हान आहे. यु.पी.ए. शासनाच्या दुसऱ्या कालखंडात अमेरिके सोबतच्या संबंधात फारसी प्रगती झाली नाही. अमेरिकेला आर्थिक आणि व्यापारिक नफा मिळून देणारी विमा सुधार आणि आण्विक उत्तरदायित्व विधेयके १५ व्या लोकसभेत मंजूर होऊ शकली नाही. सिरीया, इराण, क्रायमिया, श्रीलंका संबंधी प्रश्नावर भारताने घेतलेली भूमिका अमेरिकेच्या भूमिकेच्या विरोधात जाणारी होती.

**प्रादेशिक अस्मिता व राष्ट्रीय हितसंबंध :**

परराष्ट्र धोरण ठरविण्याचा अधिकार हा केंद्र शासनाचा घटकराज्य आणि तेथील प्रादेशिक पक्ष परराष्ट्र धोरण ठरविण्याचा नाकारण्याचा त्यात आळकटी करण्याचा प्रयत्न करतांना दिसत आहेत. केंद्रात स्पष्टपणे बहुमत नसल्याचा अभाव असल्याने प्रादेशिक पक्षांनी सौदेबाजी चे राजकारण करत परराष्ट्र धोरणातील अनेक महत्वाचा निर्णयावर या आधी नाकाराधिकार वापरला होता. परंतु मोदी यांच्या सरकारला स्पष्टपणे बहुमत असल्याने नकाराधिकाराचा प्रश्नच भविष्यात उपस्थित होणार नाही.

राष्ट्रीय पातळीवर वाढता दहशतवादी हिंसाचार, नक्षलवाद, बांगलादेश घुसखोरी, अंतर्गत आणि बाह्य सुरक्षा त्या सोबतच आशियातील चीनचा वाढता आक्रमतावाद, बी.आर.आय. सारखे प्रकल्प, हिंदी महासागरातील घुसखोरी चे प्रयत्न, शेजारी देशांना कर्जबाजारी करून भारताला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न पाकिस्तान मधील आर्थिक परीक्षेत्र, सामरिक संबंध या सर्वांमुळे भारता पुढे मोठे आव्हान उभे आहे. अशा आव्हानाना कशे हाताळायचे त्यांचा सामना कसा करयचा हे प्रश्न देशातील सरकार पुढे निर्माण झाले आहे. त्या

मुळे गुंतागुंतीच्या झालेल्या परराष्ट्र धोरणाची हाताळणी कशी करायची हा महत्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय परराष्ट्र धोरणाचे अधिकाधिक लोकशाही करण होणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**

1. *भारताचे परराष्ट्र धोरण – प्रा. व्ही. बी. पाटील – के सागर पब्लिकेशन पुणे, २०१०, पृक्र. 78*
2. *कित्ता पृक्र. 79*
3. *कित्ता पृक्र. 82*
4. *कित्ता पृक्र. 86*
5. *डॉ. शैलेन्द्र देवळानकर – भारतीय परराष्ट्र धोरण सातत्य आणि स्थित्यंतर – प्रतिमा प्रकाशन पुणे, प्रथम आवृत्ती दृ २००७ , पृक्र. 48*
6. *संपा. डॉ. अशोक नाईकवाडे – जागतिक राजकारणातील भारताची भूमिका – कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथम आवृत्ती २०१४, पृक्र. १०४*
7. *आर. एस. यादव – भारत की विदेश नीती – डार्लिंग किंडरस्ले (इंडिया) प्रा.लि. नई दिल्ली – २०१३, पृक्र. 180*
8. *दैनिक सकाळ – लेख –१५ ओगस्ट 2018*
9. *डॉ. प्रतिभा भोरजर – २१ व्या शतकातील भारतीय परराष्ट्र धोरणापुढील आव्हानांचे व्यवस्थापन – आधार पब्लिकेशन अमरावती, २०१४, पृक्र. 69*
10. *आर. एस. यादव – भारत की विदेश नीती – डार्लिंग किंडरस्ले (इंडिया) प्रा.लि. नई दिल्ली –२०१३, पृक्र. ४५०*
11. *दैनिक लोकसत्ता – लेख – २६ जानेवारी 2019*